महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ ०९ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे भव्य उद्घाटन पार पडले. या सोहळयाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, राज्यपाल आचार्य देवव्रत, उद्योगपती गौतम अदानी, केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री राम मोहन नायडू आणि राज्याचे नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित होते. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे भारतातील पहिले पूर्णपणे डिजिटल विमानतळ ठरणार असून, अत्याधुनिक तंत्रज्ञान, पर्यावरणपूरक रचना आणि स्मार्ट प्रवासी सेवांच्या दृष्टीने हे जागतिक दर्जाचे केंद्र मानले जात आहे.

उद्घाटनानंतर ४५ ते ६० दिवसांनी पहिले उड्डाण घेण्याची शक्यता आहे. 'इंडिगो', 'एअर इंडिया' आणि 'अकासा एअर' सारख्या प्रमुख देशांतर्गत विमान कंपन्यांनी सेवा सुरू करण्याची घोषणा केली आहे. विविध सुरक्षा,




## पंतप्रधान मोदींनी भाषणात दि. बा. पाटील यांचं नाव घेताच टाळ्यांचा कडकडाट

इमिग्रेशन आणि कस्टम एजन्सी एकत्रित केल्यानंतर डिसेंबरच्या सुमारास एनएमआयए एकाचवेळी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे सुरू करेल, अशी अपेक्षा आहे. सर्व टप्पे पूर्ण झाल्यानंतर, हे विमानतळ लंडन हीथ्रो विमानतळाच्या बरोबरीने सर्वात मोठ्या प्रवासी क्षमतेपैकी एक ठरेल.

**■ एनएमआयएची केली पाहणी केली, दिव्यांग मुलांशी संवाद**

मोदी यांचे आगमन नव्याने बांधलेल्या या अत्याधुनिक विमानतळावर झाल्यानंतर त्यांनी विमानतळाचे औपचारिक उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी टर्मिनल इमारतीचा सविस्तर आढावा घेतला आणि प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सोयीसुविधांची पाहणी केली. या भेटीदरम्यान मोदींनी विशेष मुलांशी संवाद साधला. भारतीय ध्वज फडकावत आणि फुलांचा गुच्छ देत या मुलांनी पंतप्रधानांचे मनापासून स्वागत केले. या प्रसंगामुळे उद्घाटन सोहळयाचा वातावरण अधिक भावनिक आणि संस्मरणीय बनला.

दि. बा. पाटील यांचं नाव दिलं जावं, अशी इथल्या स्थानिक भूमिपुत्रांची मागणी आहे. त्यांच्या या मागणीनुसार अनेक घडामोडी घडल्या आहेत. स्थानिकांनी यासाठी आंदोलन देखील केलं होतं. या सर्व घडामोडींनंतर दि. बा. पाटील यांच्या नावाचा प्रस्ताव केंद्रात पाठवण्यात आला आहे. तिथे प्रस्ताव मान्य झाल्यानंतर विमानतळाला नाव देण्यात येणार आहे. या सगळया घडामोडींदरम्यान आज विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पार पडलं. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठोपाठ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील आपल्या भाषणात दि. बा. पाटील यांचा उल्लेख केला.

> "
> **गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या भव्य नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज पार पडलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी आपल्या भाषणात लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव घेतलं. अतिशय भव्यदिव्य असा आजचा विमानतळ उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. पण सकाळपासून लोकनेते दि. बा. पाटील यांचं नाव घेण्यात आलेलं बघायला मिळालं नव्हतं. उद्घाटनाच्या कार्यक्रमावेळी भाषण करताना सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दि. बा. पाटील यांच्या आठवणींना उजाळा दिला. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील दि. बा. पाटील यांच्या स्मृतींना उजाळा दिला.**

## लक्षवेधी

## कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे वाङ्मयीन पुरस्कारासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कोकण मराठी साहित्य परिषदेतर्फे कोकणातील सभासद साहित्यिकांना विविध वाङ्मयीन व वाङ्मयेतर पुरस्कार प्रतिवर्षी दिले जातात. सन २०२४ - २५ साठी घोषित होणाऱ्या वाड्मयीन पुरस्कारासाठी साहित्य मागविण्यात येत आहे. हे सर्व पुरस्कार कोकण मराठी साहित्य परिषदेच्या सभासद असणाऱ्या लेखकांसाठी आहेत. या पुरस्कारांमध्ये प्रथम श्रेणीचे बारा पुरस्कार, द्वितीय श्रेणीचे पाच, विशेष श्रेणीचे तीन पुरस्कार आणि वाड्मयेतर बारा पुरस्कार दिले जाणार असून, यापैकी प्रथम श्रेणीच्या पुरस्कारासाठी पाच हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि द्वितीय व विशेष पुरस्कारासाठी प्रत्येकी तीन हजार, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र प्रदान केले जाणार आहे. यामध्ये प्रथम श्रेणी पुरस्कारात र. वा. दिघे स्मृती कादंबरी पुरस्कार, वि. सी. गुर्जर स्मृती कथासंग्रह पुरस्कार, आरती प्रभू स्मृती कविता संग्रह पुरस्कार, धनंजय कीर स्मृती आत्मचरित्र पुरस्कार, श्रीकांत शेट्ये स्मृती चरित्र पुरस्कार, प्रभाकर पाध्ये स्मृती समीक्षा पुरस्कार, भाई भगत चित्रपट - नाट्य - विषयक पुरस्कार, अनंत काणेकर स्मृती ललित गद्य पुरस्कार, प्र. श्री. नेरुरकर स्मृती बालवाङ्मय पुरस्कार, वि. कृ. नेरुरकर स्मृती संकीर्ण पुरस्कार, फादर स्टीफन सुवार्ता वैचारिक पुरस्कार, रमेश कीर नाटक - एकांकिका पुरस्कार यांचा समावेश आहे. तर द्वितीय श्रेणी पुरस्कारामध्ये वि. वा. हडप स्मृती कादंबरी पुरस्कार, विद्याधर भागवत स्मृती कथासंग्रह पुरस्कार, वसंत सावंत स्मृती कविता पुरस्कार, अरुण आठल्ये स्मृती संकीर्ण पुरस्कार व सौ. लक्ष्मीबाई व न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे ललित गद्य पुरस्कार दिले जाणार आहेत. त्यासोबतच कोकण मराठी साहित्य परिषदेच्या वतीने संपादन, कादंबरी, कथासंग्रह या प्रकारात विशेष पुरस्कार दिले जाणार आहेत.

या पुरस्कारासाठी लेखक, कवी हे कोकण मराठी साहित्य परिषदेच्या कार्यक्षेत्रातील (सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई) आणि कोकण मराठी साहित्य परिषदेचे आजीव सभासद असणे आवश्यक असून, तशा प्रकारचे कोमसाप जिल्हाध्यक्ष अथवा शाखाध्यक्षांचे प्रमाणपत्र किंवा सभासद पावतीची छायांकित प्रत यासोबत जोडणे आवश्यक आहे. तर सौ. लक्ष्मीबाई व न्यायमूर्ती राजाभाऊ गवांदे ललित गद्य पुरस्कारासाठी कोकणासह गोवा - कारवार - बेळगाव या प्रदेशातील लेखकांचाही विचार केला जाणार आहे. पुस्तकाचा वाङ्मय प्रकाराचा स्पष्ट निर्देश, आपले पूर्ण नाव, पूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ईमेल, लेखकाने पुरस्कारासोबत सादर करावयाचा आहे.

वरील पुरस्कारासाठी पुस्तके ही १ एप्रिल २०२४ ते ३१मार्च २०२५ या कालावधीत प्रसिद्ध झालेली असावीत. पुरस्कारासाठी आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी, श्री. माधव विश्वनाथ अंकलगे, केंद्रीय कार्यवाह - कोमसाप, कवी केशवसुत स्मारक संकुल, मालगुंड पो. मालगुंड ता. जि. रत्नागिरी - ४१५६१५ याठिकाणी पाठवावेत. अधिक माहितीसाठी ९७६४८८६३३० / ९०२१७८५८७४ यावर संपर्क साधण्याचे आवाह कोमसापच्या केंद्रीय अध्यक्षा नमिता कीर, केंद्रीय कार्याध्यक्ष प्रा. डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले आहे.



## आ . किसन कथोरे यांच्या हस्ते बांधकाम कामगारांना गृहउपयोगी भांडी संचाचे वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** महाराष्ट्र शासन कामगार विभाग, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, श्रमिक नाका कामगार संघटना, वांगणी यांच्या विद्यमाने आणि भारतीय जनता पार्टी अंबरनाथ ग्रामीण च्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी गृहउपयोगी भांडी संच वाटप व आरोग्य तपासणीचे आयोजन यशस्वीरित्या संपन्न झाले.

या उपक्रमात बांधकाम क्षेत्रातील नोंदणीकृत कामगारांना रोजच्या जीवनातील आवश्यक ३० भांड्यांचा गृहउपयोगी संच विनामूल्य वितरीत करण्यात आला . तसेच यासोबत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये कामगारांची प्राथमिक आरोग्य तपासणी, प्रगत चाचणी आणि अपघातप्रकरणी त्वरित वैद्यकीय समुपदेशन व उपचार यासह विविध तपासण्या करण्यात आल्या.

## ठाणे महापालिका उभारणार दंत चिकित्सालय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ८** ठाणे शहरातील गोरगरीब व झोपडपट्टी भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी ठाणे पालिकेचे आरोग्य विभाग प्रयत्नशील आहे. याच क्रमात, पालिकेच्या सी. आर. वाडीया आरोग्य केंद्रात सुपर स्पेशालिटी दंत चिकित्सा विभाग उभारण्यात येणार आहे. येथे दोन महिला तज्ज्ञ दंत चिकित्सक नियुक्त करण्यात आल्या असून, नागरिकांना मोफत दंत उपचार उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. ठाणे पालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातून नागरिकांना उत्तम आरोग्यसेवा दिली जात आहे. तसेच, आयुष्मान आरोग्य मंदिर आणि काही प्रसूतिगृहांचे कायापालट यामुळे ठाणेकरांना आरोग्यसेवा अधिक सुलभ झाली आहे. खासगी दवाखान्यात साधा दात काढणेदेखील हजारो रुपये खर्चिक ठरते, तर रूट कॅनल, सिमेंट भरणे यांसारखे उपचार सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला परवडत नाहीत. त्यामुळे महापालिकेने टेंभी नाका येथील सी. आर. वाडीया आरोग्य केंद्रात अत्याधुनिक स्वरूपातील दंत चिकित्सालय उभारण्याचे पाऊल उचलले आहे. येत्या काही दिवसांत नागरिकांना या सुविधेचा मोफत फायदा घेता येणार आहे. पहिल्या टप्प्यात दात स्वच्छ करणे, रूट कॅनल, दात काढणे, सिमेंट भरणे यासह इतर महत्त्वाचे उपचार दिले जातील. पुढील टप्प्यात दात बसविण्यासाठी आवश्यक सुविधादेखील उपलब्ध करून दिल्या जातील.

## वायू प्रदूषणामुळे अंबरनाथची घुसमट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः पावसाळा थांबताच मोकळा श्वास घेण्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांना औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांतून सोडल्या जाणाऱ्या रासायनिक वायूमुळे घरात स्वतःला बंद करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही दिवसांपासून अंबरनाथच्या पश्चिमेतील मोरिवली औद्योगिक वसाहतीतून रासायनीक वायू सोडला जात असून मंगळवारीही मोठ्या प्रमाणावर वायू गळती पाहायला मिळाली. परिणामी अंबरनाथ पूर्व, पश्चिम भागात धुराचे साम्राज्य पसरले होते. यातून रासायनिक दर्प येत होता. त्यामुळे नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागले.**

गेल्या काही वर्षात अंबरनाथ, बदलापूर या शहरांमध्ये औद्योगिक प्रदुषणाचे परिणाम सर्वसामान्य नागरिकांना भोगावे लागत आहेत. नाले, नद्यांमध्ये सोडले जाणारे रासायनिक सांडपाणी प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने प्रदुषण वाढते आहे. परिणामी नद्यातील जलचरांना त्याचा फटका बसतो. अंबरनाथसारख्या शहरात वालधुनी नदीतही काही दिवसांपूर्वीच रासाययनिक सांडपाणी सोडल्याने नदीचा रंग पिवळा झाला होता. तर गेल्या काही दिवसांपासून वायू गळतीने अंबरनाथमध्ये डोके वर काढले आहे.

अंबरनाथ शहराच्या मोरिवली परिसरात असलेल्या औद्योगिक वसाहतीतून सातत्याने रासायनिक वायू सोडला जात असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे अंबरनाथच्या पूर्व आणि पश्चिमेतील बहुतांश भागाला दुर्गंधीचा सामना करावा लागतो. गेल्या शुक्रवारी अंबरनाथच्या याच भागातून वायू सोडण्यात आला होता.

तर मंगळवारीही रात्री रासायनिक वायू सोडण्यात आला. त्यामुळे अंबरनाथ पश्चिमेतील लादी नाका, विमको नाका, मोरिवली, पूर्वेतील बी केबिन रस्ता, निसर्ग ग्रीन, ग्रीन सिटी, मोरीवली गाव आणि आसपासच्या परिसरात धुराचे साम्राज्य पसरले होते. या धुरामुळे दृश्यमानताही घटल्याचे दिसून आले. सर्वत्र धुराचे साम्राज पहायला मिळत होते. त्यामुळे वाहनचालकांना त्रासाला आणि दुर्गंधीला सामोरे जावे लागले.









## केडीएमसीची कर वसुली मोहिम अधिक तीव्र !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व प्रभागातील कर विभागातील कर्मचाऱ्यांनी मालमत्ता कर वसुलीची मोहिम अधिकाधिक तीव्र केली असून, काल 3/क प्रभागातील सहा.आयुक्त धनंजय थोरात, कर अधिक्षक जयवंत बजागे व त्यांच्या पथकाने ॲचिवर्स कॉलेज, कल्याण (पश्चिम) यांच्याकडून मालमत्ता कराच्या थकबाकीपोटी रु.44,50,958/- इतक्या रक्कमेचा धनादेश वसूल केला. तसेच बोरगांवकर वाडी, कल्याण रेल्वे स्थानक परिसर येथील एकुण 7 गाळे रक्कम रु.23,91,721/- इतक्या थकबाकी पोटी सील करण्यात आले. त्याचप्रमाणे हॉटेल शिवसागर, व्हेज रेस्टॉरंटचे देखील एकुण 7 गाळे रक्कम रु.12,24,073/- इतक्या थकबाकी पोटी सील करण्याची कारवाई 3/क प्रभागाच्या कर विभागामार्फत काल दिवसभरात करण्यात आली. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी देखील काल 9/आय व 10/ई प्रभागातील मालमत्ता कर विभागाचा, भागनिहाय लिपिक वसूलीचा आढावा घेवून, कर वसूली वाढविण्याच्या सक्त सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com





# मराठी भाषा ही रस, भाव आणि माधुर्याने ओतप्रोत भरलेली

## - प्रा. विनायक आभाळे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील साकेत कनिष्ठ महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त मंगळवारी भाषा विभागाद्वारे मराठी भाषेतील गोडवा या विषयावर प्रा. विनायक आभाळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. आभाळे यांनी आपल्या प्रभावी भाषणातून मराठी भाषेतील गोडवा आणि तिच्या अर्थवैविध्याचा सुंदर उलगडा केला. विविध उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी मराठी भाषेचा मान, तिची समृद्धता आणि अलंकारयुक्त सौंदर्य यावर प्रकाश टाकला. त्यांनी मराठी भाषा ही रस, भाव आणि माधुर्याने ओतप्रोत भरलेली असल्याचे सांगितले. तसेच 'मन' या विषयावर बोलताना बहिणाबाई चौधरींच्या कवितेचा उल्लेख करून विद्यार्थ्यांना अंतर्मुख होण्याचा संदेश दिला. व्याख्यानाच्या शेवटी त्यांनी मोबाईलच्या अतिवापराचे दुष्परिणाम स्पष्ट करत विद्यार्थ्यांना सजग आणि जबाबदार राहण्याचे मार्गदर्शनही केले. या कार्यक्रमाला साकेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष रुकारी, उपप्राचार्या पिऊली भट्टाचार्य, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रकल्प अधिकारी प्रा. संजय चौधरी, मराठी विभाग प्रमुख प्रा. ज्योती शिर्के उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि मराठी भाषेच्या गोडव्याचा अनुभव घेतला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. साक्षी गोळे यांनी केले.

# मुरबाडमध्ये महर्षी वाल्मिकी जयंती साजरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर येथे अखिल भारतीय वाल्मिकी नवयुवक संघाच्या वतीने आदिकवी महर्षी वाल्मिकी जयंती मोठ्या उत्साहात आणि आनंददायी वातावरणात साजरी करण्यात आली. समाजातील एकतेचा, सन्मानाचा आणि ज्ञानाचा संदेश देणाऱ्या या जयंती सोहळ्याला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या वेळी "रामायण" या महाकाव्याचे रचनाकार आणि प्रथम कवि महर्षी वाल्मिकी यांच्या जीवनावर आधारित भाषणे सादर करण्यात आले.

या प्रसंगी मुरबाड नगर पंचायतीचे माजी नगराध्यक्ष मोहन सासे, माजी नगरसेवक रवींद्र देसले, सामाजिक कार्यकर्ते सागर चंबावणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दिपक वाघचौरे, मनसेचे अध्यक्ष देवेंद्र जाधव, वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष गुरुनाथ पवार, आरपीआयचे उपाध्यक्ष रमेश देसले, भाजपचे कार्यकर्ते नरेश मोरे व विष्णू देवा गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या जयंती महोत्सवाचे यशस्वी आयोजन अखिल भारतीय वाल्मिकी नवयुवक संघ महाराष्ट्र यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

आयोजन समितीत तालुका अध्यक्ष शंकरभाई गोहिल, तालुका उपाध्यक्ष तुळशीराम परमार, महासचिव प्रकाश परमार, शहराध्यक्ष किर्ती गोहिल, तसेच विशाल गोहिल, अशोक रील, विष्णू रील, विजय परमार, रोहित चौहान, अनिल सुरडकर यांचा उत्साही सहभाग होता. एकतेचा आणि सामाजिक समरसतेचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला.

महर्षी वाल्मिकींच्या आदर्शांवर चालत समाजात समानता, शिक्षण व एकात्मतेचा दीप प्रज्वलित राहावा, हाच या कार्यक्रमाचा मुख्य संदेश होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील थोरात यांनी केले होते.

# 'प्रेमाची गोष्ट २' मधून रिधिमा पंडितची मोठ्या पडद्यावर एन्ट्री!

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट प्रस्तुत 'प्रेमाची गोष्ट २' हा दिवाळीत प्रदर्शित होणारा रोमॅण्टिक चित्रपट सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. या चित्रपटात रिधिमा पंडित पहिल्यांदाच रुपेरी पडद्यावर झळकताना दिसणार आहे. हिंदी मालिकांमधून ('बहु हमारी रजनीकांत', 'खतरों के खिलाड़ी') प्रचंड लोकप्रियता मिळवलेली रिधिमा तिच्या सोशल मीडियावरील सक्रिय उपस्थिती आणि रिलेटेबल कंटेंटमुळे जेन झी प्रेक्षकांमध्येही सुपरहिट ठरली आहे. तिच्या इन्स्टाग्रामवरील पोस्ट्स आणि रील्स नेहमीच ट्रेंडिंगमध्ये असतात. त्यामुळे तिचं मराठी चित्रपटसृष्टीतील पदार्पण केवळ मराठी चाहत्यांसाठीच नाही, तर हिंदी आणि तरुण प्रेक्षकांसाठीही एक खास सरप्राईज ठरणार आहे.

नुकतंच प्रदर्शित झालेलं 'ये ना पुन्हा' हे रिधिमा आणि ललित प्रभाकरवर चित्रित झालेलं रोमॅण्टिक गाणं सोशल मीडियावर सध्या धुमाकूळ घालत आहे. त्यांच्या



ऑन-स्क्रीन केमिस्ट्रीमुळे प्रेक्षकांमध्ये उत्सुकता आणखी वाढली असून, चित्रपटाबद्दलचं कुतूहल अधिकच वाढत चाललं आहे.

आपल्या पहिल्या मराठी चित्रपटाविषयी रिधिमा म्हणाली, "हा माझा पहिला मराठी चित्रपट आहे आणि पहिल्यांदाच मी मोठ्या पडद्यावर मुख्य भूमिकेत दिसतेय. त्यामुळे उत्साह आणि थोडीशी धडधड अशा मिश्र भावना आहेत. सतीश राजवाडे सरांसोबत काम करणं माझ्यासाठी एक खास अनुभव ठरला. ललितसोबत काम करताना खूप मजा आली. तो अत्यंत उत्तम सहकलाकार आहे. एकूणच हा प्रवास माझ्यासाठी खूप स्पेशल आणि अविस्मरणीय ठरला असून प्रेक्षक माझ्या या नव्या प्रवासाला नक्कीच प्रेम देतील, अशी मला खात्री आहे."

या चित्रपटाचे दिग्दर्शन सतीश राजवाडे यांनी केले असून, निर्माते संजय छाब्रिया आणि सह-निर्माते अमित भानुशाली आहेत. २१ ऑक्टोबर रोजी दिवाळीच्या निमित्ताने प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटात ललित प्रभाकर, ऋचा वैद्य, रिधिमा पंडित, स्वप्नील जोशी आणि भाऊ कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# सरन्यायाधीशांवर हल्ला करणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## भीमशक्तीची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** सरन्यायाधिश भुषण गवई यांच्यावर केलेल्या हल्ल्याचा, अपमानकारक कृतीचा व जातीय प्रवृत्तीचा भिमशक्ती संघटना महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला असून या हल्लेखोरावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी भीमशक्ती संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत भीमशक्ती संघटनेचे संस्थापक, खासदार चंद्रकांत हंडोरे यांच्या आदेशाने महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. अपेक्षा दळवी यांच्या शिष्टमंडळाने कल्याण मधील महात्मा फुले चौक पोलिसांना निवेदन देण्यात आले. यावेळी चळवळीचे नेते अण्णा रोकडे, बाळ भालेराव, अरुण पठारे, माजी नगरसेवक भीमराव डोळस, भीमशक्तीचे रमेश साळवे, मंगेश इंगळे, सचिन भोसले, अशोक पगारे, सचिन खरात, आदर्श दळवी, अभिमन्यू गायकवाड, विलास सकपाळ, सुरेश गमरे, सोमा राठोड, आशा सोनवणे कुमार कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. सुप्रीम कोर्टात आजपर्यंत सरन्यायाधीश या पदावर अनेक उच्चवर्णीय आले. मात्र देशाचं इतिहासात एक अनु. जातीची व्यक्ती पहिल्यांदा उच्च पदावर पोहचल्याने जातीय वाद्यांना हे पटलेले नाही. जातीय मानसिकता व विचारसरणी असलेला ॲड राकेश किशोर हा वकिली व्यवसायाला लांछन लावणारे आहे. ते भारतीय संविधानातील नितीमुल्यांना मानत नाही. जातीय द्वेष भावना जास्त प्रमाणात दिसून येते. तरी या द्वेषमुलक विमारसणी व अनु. जातीच्या सरन्यायाधिशच्या केलेल्या अशोभनीय गैरवर्तनाबद्दल देशद्रोह आणि अनु. जाती जमाती अत्याचार प्रतिबंध २०१५ सुधारित अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्याची देशातील पहिली मागणी भीमशक्तीने केली असून गुन्हा दाखल न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ॲड. अपेक्षा दळवी यांनी दिला आहे.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या

## शिवसेनेचा भिवंडीत हंबरडा मोर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टी पावसामुळे शेतकरी कुटुंबाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकरी देशोधडीला लागला आहे.शेतीसाठी काढलेले कर्ज फेडण्यासाठी पैसा शिल्लक नसल्याने शेतकरी कुटुंब हवालदिल झाले आहेत.अनेकजण आत्महत्येचा मार्ग स्विकारत आहेत. महाराष्ट्रात भयंकर परिस्थिती निर्माण झाली असताना शासन मुक भूमिका बजावत आहे. त्यामुळे सरकारचा शिवसेना (उबाठा) गटाने निषेध व्यक्त करीत शासनाने तात्काळ शेतकऱ्यांना अर्थिक मदत करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी या मागणीसाठी आज दुपारी भिवंडी उपविभागीय कार्यालय व तहसीलदार कार्यालयात हंबरडा मोर्चा काढून उपविभागीय अधिकारी अमित सानप व नायब तहसीलदार आदेश म्हात्रे यांना निवेदन सादर करण्यात आले.




भिवंडी शिवसेना जिल्हाप्रमुख मनोज गगे, शहरप्रमुख प्रसाद पाटील व तालुकाप्रमुख करसन ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता.या मोर्चात शिवसेना उपनेते विश्वास थळे, महिला आघाडी प्रमुख वैशाली मेस्त्री,राजन काबाडी, गणेश मोरे,कविता भगत, प्रेमनाथ म्हात्रे,राजा पुण्यार्थी यांच्यासह शेकडो शिवसैनिक व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

विधानसभेच्या निवडणूकीच्या वेळी सरकारने शेतकऱ्यांना सरसकट कर्ज मुक्तीचे आश्वासन दिले होते.मात्र वर्ष उलटुन गेले तरी याबाबत कोणताही निर्णय सरकारने घेतलेला नाही असे असताना राज्यात झालेल्या अतिवृष्टी नैसर्गीक आपत्तीमुळे शेती चे प्रचंड नुकसान झाले आहे त्यामुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे.महागडी खते,औषधे दरवाढीमुळे आर्थिक शेतकरी संकटात सापडले आहेत शेती ग्रामीण भागाचे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे.मात्र शेती उत्पन्नाला हमीभाव, योग्य बाजार नसल्याने बहुतांश शेतकरी बँक व सावकाराकडील कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले आहेत. अनेकांना थकबाकीमुळे नोटीसा, जप्ती कार्यवाही, काहीकडून तर आत्महत्येचे टोकाचे निर्णय घेतले जात आहे दिवसेंदिवस संख्या वाढत आहे त्यामुळे शेतकऱ्यांना जगण्याची पुन्हा उभारी देण्यासाठी सरसकट कर्जमुक्ती व परिणामकारक उपाययोजना करणे शासनाने आवश्यक आहे अशी मागणी शिवसेना तालुकाप्रमुख करसन ठाकरे यांनी केली.

अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शेतकऱ्यांना हेक्टरी रुपये 50 हजार आर्थिक मदत त्वरित जाहीर करावी. आपत्तीमुळे नुकसान झालेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमुक्त करावे.

पीक विम्याचे कठीण निकष तातडीने शिथिल करून पंचनाम्याची प्रक्रिया बाजूला ठेवत विम्याची रक्कम त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी.

अतिवृष्टीमुळे घरे व पशुधनाचे नुकसान झालेल्या नागरिकांना, जुने निकष न लावता, योग्य आणि पुरेसा मोबदला त्वरित देण्यात यावा अशा विविध मागण्याचे निवेदन यावेळी भिवंडी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना शिवसेनेचेतीने देण्यात आल्याची माहिती भिवंडी शिवसेना तालुका प्रमुख करसन ठाकरे यांनी दिली.

# जल जीवन मिशनची जलवाहिनी निकृष्ट दर्जाची ?

## - सरपंच सौ.रूपाली महेश पाटील

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामपंचायत खरोशी पेण या हद्दीत टाकण्यात आलेली पाईप लाईन ही निकृष्ट दर्जाची असल्याने वारंवार नादुरूस्त होत आहे .टॅपींग पॉईंट पासून देवीच्या डोंगरावरील टाकी पर्यंत जी. आय. पाईप मध्ये टाकून मिळणे बाबतची तक्रार खरोशी ग्रामपंचायत सरपंच सौ.रूपाली महेश पाटील यांनी ग्रामीण पाणीपुरवठा उप अभियंता पेण यांना केली आहे.

पुढे दिलेल्या लेखी तक्रार मध्ये असेही सांगितले आहे की ग्रामपंचायत खरोशी हद्दीत जलजीवन मिशन अंतर्गत पाण्याची पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. ह्या कामाबाबत ग्रामपंचायतीने वेळोवेळी आपल्या कार्यालयाकडे पत्रव्यवहार केलेला आहे. सदरचे काम हे अत्यंत दिरगांईने पूर्ण केले. मात्र सदरची पाईप लाईनचे काम हे निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याने सदरची पाईप लाईन ही वारंवार फुटून लाखो लिटर पाणी वाया जात आहे. सदर लाईनची दुरूस्ती केल्यावर त्यादिवशी पुन्हा लाईन फुटण्याचे प्रकार घडत आहेत.तसेच खरोशी गाव हे केळंबा मातेच्या मंदिरासाठी प्रसिध्द आहे. येथे नवरात्रौत्सवात महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून लाखो भावीक देवीच्या दर्शनासाठी आले. परंतू ह्या वेळेस पाईप लाईन वारंवार नादुरूस्त होत असल्याने पाण्याची मोठ्या प्रमाणावर टंचाई भासली व भावीकांची गैरसोय झाली. तरी सदरची टॅपींग पॉईंट पासून देवीच्या डोंगरावरील टाकी पर्यंत एच.डी.पी. लाईन बदलून जी.आय. मध्ये टाकून मिळावी. तसेच जो पर्यंत पाईप लाईन बदलण्याचे काम पूर्ण होत नाही. तो पर्यंत संबंधीत कॉन्ट्रॅक्टरला कोणतेही बिल अदा करण्यात येऊ नये अशी मागणी सरपंच सौ.रुपाली महेश पाटील यांनी केली आहे.तसेच माहिती साठी व पुढील कार्यवाही साठी मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प. अलिबाग व गट विकास अधिकारी पंचायत समिती, पेण यांनाही पत्रव्यवहार केला आहे.

# डॉ. विजय कोकणे ग्लोबल व्हिजनरी नॅशनल अवॉर्डने सन्मानीत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगडचे संचालक डॉ. विजय हिरामण कोकणे यांचा 05 ऑक्टोबर 2025 रोजी हरयाणा येथे आयोजीत "अँटी करप्शन फाऊंडेशन ऑफ इंडिया द्वारा आयोजित राष्ट्रीय पुरस्कार वितरण कार्यक्रमाप्रसंगी' नॅशनल सुप्रीमो (ACFOI) नरेंदर अरोरा तसेच सुप्रसिद्ध बॉलिवूड सिने अभिनेत्री पद्मिनी कोल्हापुरे व बॉलीवूड सिने अभिनेता शहाबाज खान, विजय तंडन धनंजय म्हात्रे नॅशनल चीफ सेक्रेटरी, रायगड जिल्ह्यातील अँटी करप्शन सदस्य व पुरस्कार विजेत्यांच्या मुख्य उपस्थितीत "सकारात्मक कौशल्य विकास व समाजसेवा कार्यासाठी हा राष्ट्रीय सन्मान पुरस्कार" सन्मान चिन्ह फ्रेम प्रमाणपत्र देऊन डॉ. विजय हिरामण कोकणे यांचा राष्ट्रीय सन्मान" करण्यात आला

"ह्यूमन कॅपॅसिटी डेव्हलपमेंट ट्रेनिंग सर्व्हिसेस" चे संचालक हिरामण कोकणे व समाजसेविका सौ सुमन कोकणे ह्यांचे डॉ विजय कोकणे हे चिरंजीव आहेत . त्यांच्या




प्रदीर्घ मार्गदर्शनाखाली डॉ. विजय कोकणे हे सातत्याने प्रगती करीत आहेत. सदर कार्यक्रमाप्रसंगी यांच्या मुख्य उपस्थितीत त्यांनी सदर पुरस्कार स्वीकारला.

डॉ विजय हिरामण कोकणे हे भारत सरकारच्या कौशल्य विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड योजनेचे विद्यमान संचालक असून सामाजिक कार्यकर्ते, विश्लेषणकार, लेखक, कवी, व चित्रकार म्हणून त्यांची आजपर्यंत, वेदांत, घोडदौड, वारली चित्रकला कलात्मक पुस्तिका, कॉलेज विश्व, प्रधानमंत्री सांसद आदर्श ग्राम योजना,मला कळलेले पी.एफ.एम.एस अशी 6 पुस्तके प्रकाशित आहेत. सदर दर्जेदार पुस्तकांच्या लेखन व "सकारात्मक समाजसेवा कार्य व कौशल्य विकास समाज प्रबोधन कार्याकरिता" त्यांना मानद डॉक्टरेट डि.लीट (HON. D. Litt ) प्रदान करण्यात आली आहे यापूर्वी देखील त्यांना समाजकार्य, कौशल्य, ग्रामीण विकास, व महिला सक्षमीकरण इत्यादी विविध विषयांमध्ये एकूण 6 मानद डॉक्टरेट प्राप्त झाल्या असून विविध क्षेत्रात 7 आंतरराष्ट्रीय, 21 राष्ट्रीय, व 50 पेक्षाही अधिक राज्य, जिल्हा व स्थानिक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत त्यांच्या 21 वर्षाच्या समाजसेवी कार्यकाळामध्ये 1 लाखां पेक्षाही जास्त समाज बांधव ,भगिनीं, दिव्यांग व् कुटुंबांमध्ये आरोग्य शिक्षण व प्रत्यक्ष सेवा, सकारात्मक विकास जनजागृती प्रशिक्षणे, मार्गदर्शन, कौशल्य वृद्धी प्रशिक्षण, व अनेक कल्याणकारी योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामुळे त्यांनी सकारात्मक समाज परिवर्तनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून त्याची दखल समाजाच्या प्रत्येक स्तरातून घेतली जात आहे.

अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित व्यक्तिमत्व व लेखक डॉ. विजय हिरामण कोकणे -हे गोल्डन स्पॅरो द्वारा आयोजित G-20 शिखर परिषद-दिल्ली येथे "स्पीकर व गेस्ट ऑफ ऑनर" पुरस्काराने सन्मान असून 'वारली चित्रकला व हस्त कला वर आधारित संशोधन कार्य व लिखाण ह्या साठी त्यांना "साऊथ वेस्टर्न अमेरिकन युनिव्हर्सिटी" तसेच महिला सक्षमीकरण व कौशल्य क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना केंब्रिज डिजिटल युनिव्हर्सिटी यांच्या माध्यमातून "मानद डॉक्टरेट आंतरराष्ट्रीय सन्मान" यापूर्वी देखील त्यांना प्राप्त आहे. त्यांना विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय यंत्रणा व संस्थांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय रवींद्रनाथ टागोर साहित्यरत्न पुरस्कार, भारत श्री राष्ट्रीय पुरस्कार, आदर्श विद्या सरस्वती राष्ट्रीय पुरस्कार व राष्ट्रीय साहित्य शिरोमणी सन्मान पुरस्कार प्राप्त आहे "महिला सक्षमीकरण,लोक सहभाग व कौशल्यविकास वृद्धी कार्यासाठी मिळालेला ' 'भारतीय समाजरत्न पुरस्कार, 'आयकॉन ऑफ एशिया पुरस्कार', 'युनिव्हर्सल मदर टेरेसा पीस अवॉर्ड', भारतीय नोबल सोशल ऍक्टिव्हिस्ट ऑफ द इयर पुरस्कार" "भारत गौरव पुरस्कार व "राष्ट्रीय पद्म गौरव पुरस्कर" इत्यादि अनेक पुरस्कार व अष्टपैलू कार्याची दखल व मूल्यमापन होऊन हिंदुस्तान टाइम्स व देशातील 130 राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्र व मॅक्झिन इत्यादींमध्ये उदयोन्मुख नेतृत्व म्हणून डॉ विजय कोकणे यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

डॉ विजय हिरामण कोकणे यांनी त्यांच्या संचालक पदाच्या कार्यकाळात केलेल्या सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल डॉ किरीट सोमैया जी (अध्यक्ष-पालक संस्था युवक प्रतिष्ठान मुंबई), डॉ मेधा सोमैया (संस्थापक अध्यक्षा), डॉ नितीन गांधी (अध्यक्ष), सौ रत्नप्रभा बेल्हेकर (उपाध्यक्ष), सौ गीतांजली ओक, नरेन जाधव, ॲड नीला तुळपुळे, ॲड पल्लवी तुळपुळे, अभिजित देव, शशिकांत दनोरीकर, सौ. सिमा विषे, सौ स्वप्नाली म्हात्रे, दत्ता नाईक यांचे विशेष आभार मानले.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




## आजचे राशि भविष्य



**मेष**
भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील.

**कर्क**
लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. आजचा काळ अनुकूल आहे, परंतु तुमच्या मेहनतीचे चांगले फळ मिळण्यासाठी तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**
सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. दिवस चांगला असेल.

**तूळ**
काही नवीन कल्पनांवरही काम कराल.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.दिनचर्येत बदल होईल.

**वृश्चिक**
मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**
कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल.

**मकर**
तुम्हाला बालपणीचा एखादा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून तुम्हाला आनंद होईल.काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कुंभ**
जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल.

**मीन**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुमचा सन्मान होईल. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते.


नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी कल्याणकर खंबीरपणे उभे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महाराष्ट्रात यंदा झालेल्या मुसळधार पावसामुळे मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. गावोगावी पाणी शिरल्याने शेतजमिनी, जनावरे आणि घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अनेक कुटुंब उध्वस्त झाली आहेत. या संकटाच्या काळात मुख्यमंत्री सहाय्यता निधीमार्फत शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मदतीसाठी कल्याणकरांनीही सढळ हस्ते पुढाकार घेतला आहे.



कल्याण पश्चिमेतील सामाजिक संस्था, उद्योगपती व मान्यवरांनी मिळून तब्बल १७ लाख रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यामध्ये कल्याणातील नामांकित बांधकाम व्यावसायिक विकास वीरकर यांनी ११ लाख, श्री गजानन महाराज मंदिर ट्रस्ट (अध्यक्ष गणेश खैरनार) यांच्याकडून ५ लाखांचा तर माजी आमदार नरेंद्र पवार यांनी वैयक्तीकपणे १ लाख रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. माजी आमदार नरेंद्र पवार यांनी याबाबत कल्याणातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक संस्था यांना मदतीचे आवाहन केले होते. त्याला अनुसरून आज ही आर्थिक मदत करण्यात आली.

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**संगणक विभाग**

**ई-निविदा सुचना क्रमांक-२०२५-२६/१**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका खालील कामाकरीता नोंदणीकृत कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संस्था यांचेकडून खालील कामांकरीता दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदेद्वारे अर्ज मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव / तपशिल | कोरे निविदा फॉर्म फी | निविदा अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कडोंमपाच्या डेटा सेंटरमधील विविध यंत्रणांची दोन वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती करणेबाबत | रु.४,२४८/- (जी.एस.टी.सह) | रु १८,०००/- | २४ महिने |

**अटी व शर्तीः**

१. कामाची सविस्तर निविदा सुचना व कोरे निविदा फॉर्म www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.०९/१०/२०२५ ते दि.२३/१०/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.
२. निविदा ई-टेंडरिंग कार्यप्रणालीव्दारे ०९/१०/२०२५ ते दि.२३/१०/२०२५ रोजी दु.३.०० वाजेपर्यंत भरता येतील.
३. निविदा शक्य झाल्यास रोजी दि.२४/१०/२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता ई-टेंडर सेल, क.डों.म.पा. येथे उघडण्यात येतील.
४. कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, क.डों.म.पा. यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररित्या सर्व निविदा धारकांसाठी बंधनकारक राहील.

**जा.क्र : कडोंमपा/जसंवि/मुका/५६६**
**दिर्नाक:- ०८/१०/२०२५**

**सही/-**
**आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.**

# कामगार विभागाच्या वेबसाईटचे मंत्री आकाश फुंडकर यांच्याहस्ते उद्घाटन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : कामगार विभागाच्या https://labour.maharashtra.gov.in या वेबसाईटचे उद्घाटन कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांच्या हस्ते मुंबईत करण्यात आले. याचबरोबर कामगार विभागाने विकसित केलेल्या ‘चॅट बोट’ला ‘श्रमदूत’ असे नाव देण्यात आले असून, या माध्यमातून कामगार व कारखानदारांना त्वरित मार्गदर्शन व सहाय्य मिळणार आहे.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या दीडशे दिवसांच्या विशेष कार्यक्रमांतर्गत कामगार विभागाने नवीन वेबसाईटची निर्मिती केली आहे. या वेबसाईटमध्ये राज्यातील सर्व कारखानदार तसेच कामगार बांधवांना उपयुक्त ठरणारी विविध माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.या उपक्रमाबाबत कामगार मंत्री ॲड.फुंडकर यांनी कामगार विभागाला आवश्यक सूचना व मार्गदर्शन केले. कामगार, कारखानदार, सर्वसामान्य नागरिक यांच्यासह दिव्यांग व्यक्तींना सुद्धा वेबसाईट वापरायला अत्यंत सोपी असावी, असेही मंत्री ॲड.फुंडकर यांनी यावेळी सांगितले.या वेबसाईटची निर्मिती करण्यासाठी कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय.ए.कुंदन, उपसचिव दीपक पोकळे, उपसचिव स्वप्नील कापडणीस आणि संबंधित अधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# शालेय स्तरावर एनसीसी प्रशिक्षणाची अंमलबजावणी करावी

### – मंत्री माणिकराव कोकाटे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, निरोगीपणा आणि नेतृत्वगुण विकसित व्हावेत यासाठी शालेय स्तरावर राष्ट्रीय छात्र सेनेचे (एनसीसी) प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), स्काऊट आणि गाईड संदर्भातील बैठकीत क्रीडा व युवक कल्याण मंत्री ॲड. कोकाटे यांनी ही भूमिका मांडली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी शालेय स्तरावर एनसीसी प्रशिक्षण सुरू करण्यासंदर्भात केंद्र शासनाला प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभावना, शिस्त आणि क्रीडाप्रेम अधिक वृद्धिंगत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी आयुक्त शितल तेली, एनसीसीचे कॅप्टन जे. जॉर्ज, सहाय्यक संचालक मिलिंद दीक्षित, शिक्षण उपसंचालक डॉ. वंदना वाहूळ, शालेय शिक्षण विभागाचे अवर सचिव अनिरुद्ध कुलकर्णी उपस्थित होते. मंत्री कोकाटे म्हणाले की, माजी सैनिक, एनसीसीचे विद्यार्थी आणि क्रीडा शिक्षकांच्या मदतीने शाळेतील शिक्षकांना क्रीडा आणि कवायतीचे प्रशिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच शारीरिक स्वास्थ्य, स्वयंशिस्त आणि प्रगल्भ विचार निर्माण होण्यासाठी हे प्रशिक्षण उपयुक्त ठरेल. विद्यार्थ्यांना मैदानी खेळाची आवड निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावर सक्तीचे क्रीडा प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. भविष्यात ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, यासाठी विविध खेळांचे प्रशिक्षण देण्याचे धोरण तयार करावे. तसेच, क्रीडा शिक्षकांची संख्या वाढविण्यासाठी आणि क्रीडा स्पर्धांतील विजेत्या खेळाडूंना शिक्षक म्हणून नियुक्तीत विशेष सवलत देण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत, असेही त्यांनी सांगितले.

एनसीसीचे प्रशिक्षण हे नेतृत्वगुण, चारित्र्यसंवर्धन, सेवाभाव आणि खिलाडूवृत्ती विकसित करण्याचे प्रभावी साधन आहे. देशाच्या आपत्कालीन परिस्थितीत सहाय्यभूत होऊ शकेल अशी शिस्तबद्ध प्रशिक्षित तरुण शक्ती घडविणे हे एनसीसीचे उद्दिष्ट आहे. तसेच, स्काऊट-गाईडच्या माध्यमातून ग्रामीण, शहरी आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये सहिष्णुता आणि नैतिक मूल्यांची जपणूक केली जाते. बैठकीदरम्यान देण्यात आलेल्या माहितीनुसार, वर्ष २०२३-२४ मध्ये राज्यातील विद्यालये व महाविद्यालयांमधील एनसीसी अंतर्गत एकूण १,००,८८४ विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत, यामध्ये कनिष्ठ विभागात ६१,३२८ आणि वरिष्ठ विभागात ३९,५०२ विद्यार्थी सहभागी आहेत.

# देशविदेशातील प्रतिनिधींनी दिली ठाणे महापालिकेस भेट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : स्थानिक स्वराज्य संस्थाची कार्यपद्धती जाणून घेण्यासाठी मुंबई-ठाण्याच्या दौऱ्यावर असलेल्या २२ देशांतील प्रतिनिधींनी बुधवारी ठाणे महापालिका मुख्यालयास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सौ. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय यांचीही पाहणी करून तेथील कार्यपद्धती जाणून घेतली.

परराष्ट्र मंत्रालयाच्या भारतीय तांत्रिक आणि आर्थिक सहकार्य कार्यक्रमाच्या अंतर्गत समाजसेवा क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी समाज विकास प्रशासन अभ्यासक्रम चालवण्यात येतो. सामाजिक क्षेत्रांतील सेवा, त्याची धोरण निश्चिती याबद्दल अभ्यासक्रमात मार्गदर्शन करण्यात येते. २३ सप्टेंबर ते १३ ऑक्टोबर या काळात होत असलेल्या या अभ्यासक्रमासाठी २२ देशातील २८ प्रतिनिधी टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत (टीस)



मध्ये दाखल झाले आहेत. हे प्रतिनिधी त्यांच्या देशात सरकारी किंवा निमसरकारी आस्थापनांशी निगिडत आहेत.

या प्रतिनिधींनी बुधवारी ठाणे महापालिका मुख्यालय येथे महापालिकेची कार्यपद्धती जाणून घेतली. उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे आणि उपायुक्त (माहिती व जनसंपर्क) उमेश बिरारी यांनी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात या प्रतिनिधींशी संवाद साधला. ठाणे शहराची रचना, पार्श्वभूमी, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन, तसेच, महापालिकेच्या कामाचे स्वरूप यांची माहिती दिली. त्यावेळी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिलीप सूर्यवंशी आणि माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर उपस्थित होते.

मुख्यालयात, सध्या सुरू असलेल्या मराठी ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीच्या निमित्ताने या प्रतिनिधींना अभिजात मराठी भाषेविषयीही अवगत करून देण्यात आले. त्यानंतर, या प्रतिनिधींनी ठाणे महापालिकेच्या महासभा होत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाची पाहणी केली. तसेच, खोपट येथील सौ. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था आणि कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय यांनाही त्यांनी भेट दिली.

# मधुकर घोरड यांची मुरबाडच्या गटशिक्षणाधिकारी पदाची तिसऱ्यांदा जबाबदारी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाडच्या गट शिक्षण अधिकारी पदी मधुकर घोरड यांची नियुक्ती करण्यात आली.मंगळवारी त्यांनी हा पदभार स्विकारला. त्यांच्या या निवडीमुळे शिक्षक वर्गातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

मुरबाड शिक्षण विभागातून गट शिक्षणाधिकारी संजय थोरात हे सेवा निवृत्त झाल्याने सदर पद रिक्त होते.

या आधी मधुकर घोरड यांनी या ठिकाणचा प्रभारी म्हणून यशस्वी पदभार पार पाडला होता. या पदाचा कामाचा त्यांना अनुभव आहे. सन २४/८/२०१२ ते सन



२०/०८/२०१३ या काळात घोरड यांच्यावर प्रथमता मुरबाडच्या प्रभारी गट शिक्षण अधिकारी म्हणून पदभार सोपविण्यात आला होता. यांनतर पुन्हा सन २३/६/२०१४ ते १०/६/२०१९ असा पाच वर्ष त्यांनी शिक्षण विभागाचा कारभार सांभाळला.

सध्या तालुक्यात शिक्षकांची संख्या पुरेशी नाही.अनेक ठिकाणी शिक्षक नसल्याने पालकांमध्ये नाराजी दिसून येत आहे. शिवाय केंद्रप्रमुखांची संख्याही कमी असल्याने काही शिक्षकांवर एकाच वेळी दोन, तीन ठिकाणांचा अतिरिक्त पदभार आहे. याशिवाय अशैक्षणिक कामे व आनलाईन माहिती भरण्यात शिक्षकांचा बराचसा वेळ जात असल्याने अनेक शिक्षक त्रासले आहेत. त्यामुळे अशा अस्ताव्यस्त स्थितीतील शिक्षणाचा कारभार घोरड कसा हाताळतात हे पाहावं लागेल.

# पडघा येथील शिवसेना( ठाकरे) मनसे यांच्या टोल बंद आंदोलनाला यश

## आंदोलनकर्त्याच्या मागण्या मंजूर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : मुंबई नाशीक महामार्गावरील विवीध मागण्यांसाठी शिवसेना ठाकरे गट, मनसे व इतर सामाजिक संघटना कडून करण्यात आलेल्या पडघा टोल बंद आंदोलनाला यश आले असून आंदोलनकर्त्यांच्यां मागण्या मंजूर करण्यात आल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

महामार्गावरील खराब, सर्वीस रस्ते यांची तात्काळ दुरुस्ती करून गटार बांधणे, पथदिवे बसवणे, आवश्यक तेथे महामार्गावर अंडरपास तयार करणे, महामार्गालगत गावातील रस्ते दूरुस्त करुन सर्वीस रस्ते तयार करणे, तळवली नाका अंडरपासचे काम लवकर करणे ,शेरेकर पाडा येथे जाण्यासाठी अंडरपास तयार करणे.व इतर मागण्यांसाठी १७ जुलै रोजी शिवसेना (ठाकरे) मनसे व इतर सामाजिक संघटनेच्या वतीने शिवसेना (ठाकरे) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पडघा येथे टोल बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले



**१९ मागण्यांचे निवेदन प्रकल्प संचालक भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांना देण्यात आले होते. निवीदा प्रक्रीयेत असुन लवकरच त्याचे कामे सुरू होणार असुन 290 कोटी रुपयांची विविध कामे प्रस्तावित असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 3 चे प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीकांत ढगे यांनी बैठकीत दीली.**

राजमार्ग प्राधिकरण यांना देण्यात आले होते. त्याची गंभीर दखल शासन स्तरावर घेऊन विविध प्रसार माध्यमांकडून दखल घेण्यात आली होती. या आंदोलनाला चांगले यश आले असुन वडपे ते पिंपरी या महामार्गावर असलेल्या गावांसाठी आवश्यक तेथे अंडरपास, सर्वीस रस्ते, पथदिवे, गटारी बनविण्यात येणार सुरू होणार असुन आवश्यक तेथे अंडरपास, उड्डाणपूल मंजुरीसाठी असुन महामार्गावरील 290 कोटी रुपयांची विविध कामे प्रस्तावित असल्याची माहिती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 3 चे प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीकांत ढगे यांनी मंगळवारी पडघा येथील महावितरण विश्रामगृहात पार पडलेल्या बैठकीत दीली. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते विश्वास थळे, जिल्हाप्रमुख कुंदन पाटील, राष्ट्रवादी(शरद पवार गट) तालुका अध्यक्ष गणेश गुळवी, शिवसेना महिला आघाडी तालुकाध्यक्ष फशीताई पाटील, पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकुर, सामाजिक कार्यकर्ते प्रफुल शेलार, भास्कर माळी, संजय पटेल, रुपेश कुडुसकर उपस्थित होते.

# कल्याण पूर्वेमध्ये बनावट सिमेंट मिक्सिंग रॅकेटचा पर्दाफाश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण पूर्व भागात निकृष्ट आणि कालबाह्य सिमेंटचे बेकायदेशीर मिश्रण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सिमेंट बॅगमधून पूर्णपणे कडक, कालबाह्य झालेले सिमेंट तोडले जात होते, ज्यावर स्पष्टपणे "विक्रीसाठी नाही" असे लिहिले होते आणि नंतर ते चाळून दुसऱ्या कंपनीच्या बॅगमध्ये भरले जात होते. राष्ट्र कल्याण पक्षाचे कल्याण-डोंबिवली



युवा जिल्हा अध्यक्ष पवन दुबे यांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर ते त्यांच्या कार्यकर्त्यांसह घटनास्थळी पोहोचले तेव्हा ही बेकायदेशीर कृती उघडकीस आली.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने सांगितले की, ही संपूर्ण कारवाई नवीन भाटिया नावाच्या व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली केली जात होती. माहिती मिळताच कोळसेवाडी पोलिसांनी जलद कारवाई केली आणि १० लाखांपेक्षा जास्त किमतीचे बनावट सिमेंट भरलेले चार ट्रक जप्त केले. तथापि, आरोपी घटनास्थळावरून पळून गेले. याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी सांगितले की गुन्हा दाखल केला जात आहे आणि संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल. स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांनी इशारा दिला आहे की या प्रकारच्या मिश्रणाचा वापर करून बांधलेले पूल, इमारती आणि रस्ते बांधकामादरम्यान कोसळण्याचा धोका आहे. ज्यामुळे जीव धोक्यात येऊ शकतात. या बेकायदेशीर आणि धोकादायक व्यवसायात सहभागी असलेल्या सर्वांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात कोणीही अशी फसवणूक करण्याचे धाडस करू नये.




# भिवंडी महानगरपालिकेच्या वतीने अभिजात मराठी भाषा निमित्त विविध कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : अभिजात मराठी भाषेसंदर्भातील जास्तीत जास्त संशोधन, संवर्धन व जनजागृती व्हावी या हेतूने प्रतिवर्षी दिनांक ०३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दिनांक ०३ ऑक्टोबर ते दिनांक ०९ ऑक्टोबर या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करणेबाबत शासन परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात आले आहे. त्यानुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त व्याखानमाला, ग्रंथप्रदर्शन, शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अभिजात मराठी भाषा सप्ताह निमित्त बुधवारी 8 ऑक्टोबर 2025 रोजी पालिका सभागृहात




कवी सतीश सोळांकुरकर यांच्या साहित्यिक गप्पांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मंगेश पाडगावकर यांच्या विविध भावरंग व्यक्त करणाऱ्या कविता सादर करीत असतानाच करणाऱ्या साहित्यिकांच्या कार्यक्रमातील अनेक गमतीजमती गप्पांच्या माध्यमातून खुमासदार शैलीत सादर केल्या.सदर कार्यक्रमास उपायुक्त विक्रम दराडे,उपायुक्त बाळकृष्ण क्षीरसागर,मुख्य लेखा परीक्षक मयुर हिंगाणे सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे व महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांनी मोठया संख्येने उपस्थिती नोंदविली व कार्यक्रमाचा मनमुराद आनंद लुटला. कवी सतीश सोळांकुरकर यांनी एक आई सोडली तर आमच्याकडे वडिलोपार्जित काही नाही या भावपूर्ण कवितेने कार्यक्रमाची सांगता केली.

# विकासकाविरोधात संदप गावातील कॉम्प्लेक्समधील 200 रहिवासी संतप्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली जवळील संदप गावातील एका मोठ्या कॉम्प्लेक्स मधील 200 रहिवासी विकासका विरोधात संतप्त झाले आहेत. विकासकाने विविध सुविधा देऊ असे सांगितले मात्र त्या अर्धवटच सुविधा दिल्या आणि गेले 3 वर्ष होऊन सुद्धा सुविधा मिळत नसल्याने रहिवाशी आक्रमक झाले आहेत.

कॉम्प्लेक्स पर्यंत येण्यासाठी साधा रस्ता नाही, पथदिवे नाहीत. तर मुबलक पाणी सुद्धा मिळत नसल्याचे रहिवासी यांनी सांगितले. तसेच मेटेनन्स घेऊन 3 वर्षात ज्या



सुविधा विकासक देणार होता त्या दिल्या नाहीत असा आरोप रहिवासी यांनी केलाय. यामुळे भाजप आक्रमक झाली असून विकासका विरोधात आंदोलन करू असा इशारा भाजपचे कल्याण जिल्हा उपाध्यक्ष संदिप माळी यांनी दिला आहे. तर येत्या दिवाळी पर्यंत रस्ता करून देऊ असे आश्वसन विकासकाच्या वतीने दिले आहे.

ठाणे ◆ गुरुवार
९ ऑक्टोबर २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# भारतीय जनता पार्टीचे कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब यांचा स्वबळाचा नारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुका लक्षात घेता भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात पॅनल निहाय संघटनात्मक बैठका तसेच इच्छुक पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन भारतीय जनता पार्टी स्वबळावर महानगरपालिका निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. जिल्हाध्यक्ष नंदू परब यांच्या बरोबर माजी आमदार नरेंद्र पवार, माजी शहर अध्यक्ष वरुण पाटील, प्रेमनाथ म्हात्रे, तसेच सर्व मंडळ अध्यक्ष,माजी नगरसेवक यांच्या उपस्थितीत पॅनल निहाय सभांचा धडाका सुरू आहे.

या बैठकीत भाजपचे सर्व जेष्ठ पदाधिकारी, व लोकप्रतिनिधी यांनी देखील एक सुराने स्वबळावर निवडणूक लढण्यास उत्सुकता दर्शविली. कल्याण डोंबिवली मध्ये भारतीय जनता पक्षावर प्रेम करणारा मोठा वर्ग राहत असून या निवडणुकीत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेवर भाजपचा महापौर बसवण्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे मत जिल्हा अध्यक्ष नंदु परब यांनी व्यक्त केले.



# स्वच्छ व सुंदर शहरासाठी नागरीकांचा सक्रिय सहभाग महत्वाचा - उपआयुक्त रामदास कोकरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : स्वच्छ व सुंदर शहरासाठी नागरीकांचा सक्रिय सहभाग देखील महत्वाचा आहे, असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी केले. महापालिकेच्या ड प्रभाग परिसरात स्थानिक बॅग कारखानदार, व्यावसायिक व नागरीकांना स्वच्छतेचे महत्व पटवून देणे आणि कचरा व्यवस्थापनात त्यांचा सहभाग वाढविणे, याकरीता सहा. आयुक्त उमेश यमगर यांनी एका बैठकीचे आयोजन केले होते, या बैठकीत मार्गदर्शन करताना उपआयुक्त रामदास



कोकरे यांनी हे प्रतिपादन केले.

या बैठकीस घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे, सहा.आयुक्त उमेश यमगर, माजी पालिका सदस्य विकी तरे, स्वच्छता अधिकारी विक्रम गायकवाड तसेच बॅग कारखानदार संघाचे पदाधिकारी आणि नागरीक उपस्थित होते. बैठकीतील उपस्थितांनी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सक्रिय सहभाग देण्याचे आश्वासन दिले.

ड प्रभागातील खडेगोळवली परिसर व पूना लिंक रोड परिसर येथील स्वच्छता तसेच मालमत्ता कर जागरुकता या उद्देशाने सदर बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत, रात्री 10 ते रात्री 12 वाजेपर्यंत पूना लिंक रस्ता, पंचमुखी हनुमान मंदिर परिसर तसेच रखमाबाई नगर परिसरात बॅग कारखानदारांकडून तयार होणारे स्क्रॅप मटेरिअल महानगरपालिकेच्या आर.सी. गाडीत नियमितपणे जमा करण्यात यावे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या. जेणेकरुन सदर परिसरात कचऱ्याचा साठा होणार नाही, आणि परिसर स्वच्छ राहिल. स्थानिक बॅग उत्पादकांनी परिसराची स्वच्छता राखावी. घरगुती कचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करुन, मगच कचरा महापालिकेच्या कचरागाडीत द्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. स्वच्छतेची सवय घरापासून सुरु होवून परिसरापर्यंत पोहचली पाहिजे, यावरही भर देण्यात आला.

सर्व फेरीवाले, भाजीवाले, फळ विक्रेते व गॅरेजधारक यांनी आपल्या व्यवसाय स्थळाची स्वच्छता दिवसभर राखावी, असेही स्पष्ट करण्यात आले. यावेळी ड प्रभागातील खडेगाळवली परिसरात गाड्यांद्वारे ओला व सुका कचरा वेगवेगळा करुन संकलीत होत आहे की नाही ? याबाबत प्रत्यक्ष पाहणी केली असता, काही नागरीक कचऱ्याचे वर्गीकरण न करता, कचरा एकत्रित देत असल्याचे निदर्शनास आले. सर्व नागरीकांनी ओला व सुका कचरा वर्गीकरण करुनच महापालिकेच्या गाडीत देण्यात यावा, अन्यथा नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे निर्देश घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त रामदास कोकरे यांनी यावेळी दिले.

# पेण नगरपालिकेच्या २४ जागांसाठी आरक्षण जाहीर



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण नगरपालिकेत 12 प्रभागांमध्ये 24 जागांचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यात प्रभाग क्रमांक 1 'अ' महिला ना.मा.प्र. व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 2 'अ' महिला सर्वसाधारण व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 3 'अ' ना.मा.प्र. महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 4 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 5 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा. प्र. सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 6 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' अनुसुचित जाती सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 7 'अ' ना.मा.प्र महिला, व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 8 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा.प्र. सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 9 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण प्रभाग

### इच्छूकांची धाकधूक वाढली

क्रमांक 10 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 11 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' अनुसुचित जमाती सर्वसाधारण, प्रभाग क्रमांक 12 'अ' सर्वसाधारण महिला व 'ब' ना.मा.प्र सर्वसाधारण असे आहेत. या आरक्षणामुळे इच्छुक उमेद्वारांची नक्कीच धाकधूक वाढली आहे. पेण नगरपालिकेच्या सभागृहामध्ये प्रांतधिकारी प्रविण पवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रभागातील आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या सोडतीसाठी मुख्याधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी जीवन पाटील, प्रशासन अधिकारी गणेशसिंघ ठाकूर, नगरपालिका कर्मचारी, तसेच राजकीय पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते.

# भिवंडीतील खराब रस्त्यावरील खड्ड्यात बसुन नागरिक काळी दिवाळी साजरी करणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात खड्डे पडून रस्ते खराब झाले आहेत.त्यामुळे शहरात अपघात व वाहतूक कोंडी सारखे विविध प्रश्न निर्माण झाले आहेत.

या संदर्भात भिवंडी पोलीस व विविध सामाजिक कार्यकर्ते व संस्था पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्त व बांधकाम विभाग अधिकारी यांना लेखी पत्र निवेदन दिली आहेत.असे असताना रस्ते दुरूस्ती बाबतीत प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात आहे.त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असुन दिवाळी सण सुरु होण्यापूर्वी तातडीने रस्ते दुरुस्त करावे अन्यथा मानसरोवर ते आसबीबी या खराब रस्त्यावरील खड्ड्यात बसून शांततामय मार्गाने माझे कुटुंबातील सदस्य व सहकाऱ्याचे मदतीने 'काळी दिवाळी' साजरी करू निषेध व्यक्त करू असे निवेदन सामाजिक कार्यकर्ते व शिक्षक ज्ञानेश्वर गोसावी यांनी



महापालिका आयुक्त अनमोल सागर यांना दिले आहे.

भिवंडी हे औद्योगिक शहर असुन दररोज मोठ्या संख्येने व्यावसायिक, नोकरदार व विद्यार्थी शहरात व शहराबाहेर विविध वाहनांने प्रवास करीत आहेत.मात्र मुख्य व अंतर्गत रस्ते खड्डे पडून खराब झाल्याने अपघात व वाहतूक कोंडी चा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांसह पोलीस सुध्दा त्रस्त झाले आहेत.काही ठिकाणी रस्त्यांचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यात आल्याने रस्ते चांगले आहेत मात्र शहरातील आसबीबी,फुलेनगर ते मानसरोवर आयुक्त निवासस्थ पर्यंत जाणारा रस्ता अतिशय खराब झाला आहे.

कामतघर, मानसरोवर - आसबीबी मार्गे जाणारा हा मुख्य रोड कल्याण महामार्गास जोडला जात असल्याने या रस्त्यावर दररोज मोठ्या संख्येने शालेय विद्यार्थ्यांसह प्रवासी नागरिक ये जा करीत असतात, रस्ता खराब असल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना वाहतूक कोंडी व खड्डयांचा प्रचंड त्रास सहन करावा लागतो, खराब रस्त्यांमुळे महिला व नागरिकांना वेगवेगळ्या शारिरीक व्याधी जडल्या आहेत. दुचाकी,चारचाकी वाहनांचे

### शिक्षकाचे पालिका आयुक्तांना निवेदन..

सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे

याबाबत लेखी निवेदन देऊन सुध्दा दुर्लक्ष होत आहे नागरिकांच्या दृष्टीने अतिशय संतापजनक बाब आहे.देशाचा महत्त्वाचा सण म्हणून दिवाळी सण ओळखला जातो या सणाला काही दिवसांनी सुरवात होणार आहे त्यामुळे महापालिका आयुक्त अनमोल सागर यांनी या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन रस्ता दुरूस्त करावा अन्यथा ऐन दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी म्हणजेच मंगळवार दि. 21 ऑक्टोबर 2025 पर्यंत मानसरोवर ते आसबीबी या रस्त्यावरील खड्ड्यात माझे कुटुंबीय व सहकारी महापालिका प्रशासनाचा निषेध करण्यासाठी शांततामय मार्गाने खड्ड्यांमध्ये बसून 'काळी दिवाळी' साजरी करू असे लेखी निवेदन सामाजिक कार्यकर्ते व शिक्षक ज्ञानेश्वर गोसावी यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहे.

# ठाणे जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यात राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम रविवार, दि. १२ ऑक्टोबर, २०२५ रोजी मोठ्या उत्साहात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत ग्रामीण भागासह बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्राचा समावेश असून, ५ वर्षाखालील सर्व बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब देऊन "पोलिओमुक्त समाज" या उद्दिष्टाकडे वाटचाल होणार आहे.

जिल्हाधिकारी ठाणे डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने या मोहिमेसाठी व्यापक नियोजन केले आहे.

मोहिमेचे तपशील:

- लसीकरण दिनांक: रविवार, १२ ऑक्टोबर २०२५
- लक्ष्य गट: ५ वर्षांपर्यंतची सर्व बालके
- एकूण लाभार्थी:

o ग्रामीण भाग (अंबरनाथ, कल्याण, शहापूर, भिवंडी व मुरबाड) – १,३१,११० बालके

o बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्र – ६८,८३३ बालके

o एकूण: १,९९,९४३ बालकांना पोलिओची लस देण्यात येणार आहे.

- एकूण लसीकरण केंद्रे (बुथ): १,८७५
- सहभागी कर्मचारी: ४,७९२

या मोहिमेसाठी प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती शिंदे यांनी समन्वय साधला असून, ठाणे जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचा एकत्रित सहभाग या मोहिमेत आहे. डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हाधिकारी ठाणे, रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, तसेच डॉ. कैलास पवार, जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय ठाणे यांनी सर्व पालकांना आवाहन केले आहे की,"प्रत्येक बालकाला पोलिओच्या लसीचे दोन थेंब देणे ही सर्वांची जबाबदारी आहे. लसीकरणाद्वारेच आपण आपल्या मुलांचे आणि देशाचे भविष्य सुरक्षित करू शकतो."

सर्व पालकांनी आपल्या बालकांना नजीकच्या लसीकरण केंद्रावर घेऊन जाऊन पोलिओ लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येत आहे.

# जीवनदीप महाविद्यालयात एड्स जनजागृतीसाठी व्याख्यान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : मानवाला आजार हे होत असतात काही आजार हे अनुवंशिक असतात काही कमकुवत रोगप्रतिकारक शक्ती यामुळे जडतात. एड्स या आजाराला घेऊन समाजात आजही अनेक गैरसमज, चुकीची माहिती पहावयास मिळते. दिनांक .०७- १०- २०२५ मंगळवारी सकाळी १०.३० वाजता जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे या आजाराबाबत जनजागृती व्हावी याकरिता; जीवनदीप महाविद्यालय गोवेली, राष्ट्रीय स्वयंम सेवा विभाग ,एड्स प्रतिबंधक व नियंत्रण कक्ष जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने हा व्याख्यान कार्यक्रम राबविण्यात आला. मा. करुणा मॅडम, मा. श्रद्धा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना सदर विषयावर समुपदेशन व मार्गदर्शन केले .संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, सचिव. सौ स्मिता घोडविंदे , संचालक. प्रशांत घोडविंदे ,डायरेक्टर.डॉ. के .बी कोरे , प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे या सर्वांचे मोलाचे सहकार्य या कार्यक्रमाला लाभले.

एन एस एस विभागप्रमुख प्रा. दिनेश धनगर, एन एस एस स्वयंसेवक , विद्यार्थी या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनश्री नाईक यांनी केले. विद्यार्थी ,स्वयंसेवक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# तारांगण मतिमंद शाळेतील मुलांनी स्वहस्ते बनवले दिवाळी साहित्य!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील तारांगण मतिमंद मुलांची निवासी कार्यशाळा शिरवली (जा. पाडा) ता. मुरबाड येथे आहे. सध्या या शाळेत एकुण 35 मुलं शिकत आहेत.ह्या मुलांना येथिल कार्यरत शिक्षक वेगवेगळे प्रशिक्षण देत असतात.

दिवाळीसाठी यावर्षी मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आकर्षक पणत्या व वेगवेगळया रंगाच्या रांगोळया बनविल्या आहेत.त्यांना ह्या कामाला उत्तेजन मिळावे व आर्थिक मदत





मिळावी ह्या हेतून शाळेने एक पूर्ण किट बनवले आहे.या संस्थेला शासनाकडून कुठलेच अनुदान मिळत नाही.स्वयंम अर्थसाहाय्य व समाजातील दानशूर व्यक्तीवर अशा संस्था चालतात .अश्या संस्था जोपासल्या व वाढल्या तर समाजाला त्याचा उपयोग होईल. मुलांना ह्या वस्तूची निर्मिती करताना एक आनंद मिळतो त्याचा मोबदला ही त्यांना मिळावा ही एक प्रामाणिक इच्छा संस्थेची आहे.

दरवर्षी दिवाळीमध्ये प्रत्येक घरात वापरात येणाऱ्या काही वस्तु शाळेमध्ये बनवल्या आहेत आणि त्यांच एक किट तयार केल आहे त्यात १) चार पणत्या २) चार रांगोळीचे रंग (रंग प्रत्येकी १०० ग्रॅम ) ३) दोन उटण्याची पाकीटे ४) सफेद रांगोळी ४०० ग्रॅम असे साहित्य पॅकेट मध्ये असणार आहे. याची किमंत फक्त १००/- ठेवण्यात आली आहे

. आपण हे किट घेऊन ह्या मुलांची दिवाळी आनंदी करावी असे आवाहन तारांगण मतिमंद मुलांची निवासी शाळेचे मुख्याध्यापक विकास म्हारसे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : मा.राज्य निवडणूक आयोगाच्या दि.23 सप्टेंबर 2025 आदेशान्वये जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे, दि.8 ऑक्टोबर 2025, संबंधित प्राधिकारी तहसिलदार.

नागरिकांकडून प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना स्विकारणे, दि.8 ऑक्टोबर ते दि.14 ऑक्टोबर 2025, संबंधित प्राधिकारी तहसिलदार.

निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे, दि.27 ऑक्टोबर 2025, संबंधित प्राधिकारी तहसिलदार. मतदान केंद्राची व मतदान केंद्र निहाय यादी प्रसिध्द करणे, दि.27 ऑक्टोबर 2025, संबंधित प्राधिकारी तहसिलदार.

रायगड जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकासाठी निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी https://raigad.gov.in, या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, याबाबत नागरिकांनी नोंद घ्यावी, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) डॉ.रविंद्र शेळके यांनी कळविले आहे.

### जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत

# कमलताई किसन कथोरे महाविद्यालयास उपविजेतेपद



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : दि. ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी बदलापूर जिमखाना येथे झालेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय म्हसाच्या विद्यार्थिनींनी उपविजेतेपद पटकावले याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी व क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

### दु:खद निधन



**कै. वामन वाळकु एलक**

मु. वसत, शेलवली ता. कल्याण यांचे शुक्रवार दिनांक ३/१०/२०२५ रोजी वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने देव आज्ञा झाली आहे.




# भिवंडी मनपाची अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी महानगर पालिकेत लोकशाही दिनामध्ये प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार महापालिकेच्या प्रभाग समिती ५ च्या कार्यक्षेत्रात असलेल्या निजामपूर भागातील भूखंड क्रमांक ४७ व न.भु.क्रमांक.७४२. पै.७४१पै घर.न.१३०६/० रॉयल हॉटेल जवळ फरहान जाहिरुद्दीन करनाळे यांनी अनधिकृत बांधकाम केलेल्या ७ अनधिकृत दुकानाचे गाळे (पत्रा) पालिकेच्या प्रभाग अधिकारी व अतिक्रमण विभागाचे पथकाने पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने निष्कासित केले.महापालिका आयुक्त अनमोल सागर व अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके यांच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात आली.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024